| MHKO050000312020 | संक्षिप्त दिवाणी दावा क्रमांक १८/२०२० मधील<br>नि.१४ वरील आदेश<br>विशाल यार्न विरुध्द पांडूरंग पाटील |
|---|---|

सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांनी दिवाणी न्यायप्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे सदरचा दावा रद्द करण्यात यावा यासाठी दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी असे कथन आहे की, सदरचा दावा हा रक्कम वसूलीचा दावा आहे असे वादीचे कथन आहे. केवळ बिलावरुन अशा प्रकारचा समरी सूट चालण्यास पात्र नाही. वादीने नियमाप्रमाणे सदरचा दावा दाखल केला नसल्यामूळे सदरचा दावा हा समरी सूट म्हणून चालण्यास पात्र नाही. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ नियम २ उपनियम १ प्रमाणे पूर्तता केली नसल्याने सदरचा दावा हा फेटाळण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. सदर अर्जावर वादी यांनी निशाणी १७ प्रमाणे म्हणणे दाखल केले असून त्यांनी असे म्हटले आहे की, सदरचा दावा हा रक्कम वसूलीसाठी दाखल केलेला आहे. समरी दाव्याकरीता आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे दाव्यासोबत जोडली आहेत. सदर दाव्यात सरनाम्यामध्ये दावा रक्कम वसूलीसाठी असे नमूद केलेले आहे. परंतू टाईपिंग दोषामूळे दिवाणी न्यायप्रक्रिया संहिता आदेश ३७ असे नमूद करण्याचे राहून गेले आहे. तरी सदरचा अर्ज हा नामंजूर करण्यात यावा असे म्हणणे मांडले.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. अभिलेखावरुन असे दिसून येत आहे की, सदरचा दावा हा संक्षिप्त दावा म्हणून वादी यांनी दाखल केला आहे. परंतू दाव्याच्या निशाणी १ मध्ये सदर दावा संक्षिप्त दावा असल्याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ च्या तरतूदीप्रमाणे सदर दाव्यात उल्लेख नाही. तसेच सदर दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ प्रमाणे दाखल केला असल्याचे

नमूद केले नाही. नियमित दिवाणी दावा व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ प्रमाणे दावा यामध्ये फरक आहे. सदर दाव्यामध्ये वादीने दिवाणी न्यायप्रक्रिया संहिता आदेश ३७ (२)(१)(अ) च्या तरतूदीप्रमाणे कारवाई केलेली नाही. त्यामूळे आज रोजी सदरचा दावा हा दिवाणी न्यायप्रक्रिया संहिता आदेश ३७ च्या तरतूदीप्रमाणे दाखल संक्षिप्त दाव्याच्या स्वरुपात दिसून येत नाही. परंतू सदर दावा हा रक्कम वसूलीसाठी असल्याचे वादीने नमूद केलेले आहे. परंतू सदरच्या या कारणामूळे वादीचा दावा रद्द झाल्यास वादीचे अपरिमित नूकसान होवू शकते. त्यामूळे सदरचा दावा हा नियमित दिवाणी दावा या स्वरुपात असल्याचे दिसून येते. त्यामूळे अर्जातील नमूद कारणांमूळे सदरचा दावा रद्द करणे न्यायोचित होणार नाही. याकरीता दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे-

## आदेश

१. सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे नामंजूर करण्यात येतो. परंतू सदरचा दावा हा नियमित दिवाणी दावा म्हणून चालविण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2022.10.20 11:13:06 +0530

**ठिकाण - इचलकरंजी.**
**दिनांक - १९/१०/२०२२**

**(एम.एम.चौधरी)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**इचलकरंजी**